# IFFI Bazaar's and Filmcity Recent – News Articles

## इफ्फी वेव्हज फिल्म बाजारात दादासाहेब फाळके चित्रनगरी



पणजी : चित्रनगरी स्टॉलचे उद्घाटन करताना व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील. बाजूला अन्य मान्यवर.

**पणजी : पुढारी वृत्तसेवा**

देश-विदेशातील चित्रपटकर्मी, भारतीय प्रादेशिक चित्रपट आणि कलाकार, तंत्रज्ञ अशा मान्यवरांच्या उपस्थितीने ५६ वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव गजबजून निघाला आहे. या महोत्सवात सगळ्यांचे लक्ष वेधून घेणाऱ्या वेव्हज फिल्म बाजार विभागात दादासाहेब फाळके चित्रनगरीने उभारलेल्या आकर्षक स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. २४ नोव्हेंबरपर्यंत हा स्टॉल सुरू राहील. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी या स्टॉलचे उद्घाटन केले. या महोत्सवातील सहभागाचे महामंडळाचे हे १० वे वर्ष आहे. फिल्म बाजारमध्ये महामंडळाचा आकर्षक स्टॉल उभारत चित्रपट उद्योग विस्ताराच्या दृष्टीने आणखी एक पाऊल महामंडळाने टाकले आहे.

ePaper
नवराष्ट्र
Mumbai | 24 November 2025 | Page 4

**आकर्षक स्टॉल** ५६ वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव विविध भाषिक चित्रकर्मींनी गजबजून निघाला

## इफ्फी बाजारात दादासाहेब फाळके चित्रनगरीचा स्टॉल खुला

### माध्यमकर्मी व चित्रकर्मींसोबत साधला संवाद

पणजी/ मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. देशविदेशातील चित्रपटकर्मी, भारतीय प्रादेशिक चित्रपट आणि कलाकार, तंत्रज्ञ अशा मान्यवरांच्या उपस्थितीने ५६ वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव गजबजून निघाला आहे. या महोत्सवात सगळ्यांचे लक्ष वेधून घेणाऱ्या वेव्हज फिल्म बाजार विभागात दादासाहेब फाळके चित्रनगरीने उभारलेल्या आकर्षक स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले आहे.



### स्वाती म्हसे पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी या स्टॉलचे उद्घाटन केले. मराठी चित्रपटांबरोबरच हिंदी चित्रपट, मालिका आणि विविध माध्यमांसाठी चित्रिकरणाच्या सोयीसुविधांबरोबरच चित्रपट उद्योगाच्या विकासाच्या दृष्टीने कार्यरत असलेल्या महामंडळाच्या योजना, त्यांचे उपक्रम या महोत्सवात उपस्थित असलेल्या जगभरातील चित्रपटकर्मींपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या स्टॉलच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

### फिल्म बाजारमध्ये महामंडळाचे अस्तित्व

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ गेली काही वर्ष सातत्याने कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासह देशातील आणि देशाबाहेरील निवडक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सहभागी होते आहे. या महोत्सवांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या फिल्म बाजारमध्ये महामंडळाने आपले ठळक अस्तित्व नोंदवले असून मराठी चित्रपटांना या बाजार विभागात व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा, विविध चित्रपट निर्माते, निर्मितीसंस्था यांच्याबरोबर संवाद साधण्यास मदत करण्याचा प्रयत्न केला आहे.

### मराठी चित्रपटांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न

गोव्यात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या बाजार विभागातही दरवर्षी चांगल्या मराठी चित्रपटांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी महामंडळ प्रयत्नशील असते. यंदा या महोत्सवातील सहभागाचे महामंडळाचे १० वे वर्ष आहे. फिल्म बाजारमध्ये महामंडळाचा आकर्षक स्टॉल उभारत चित्रपट उद्योग विस्ताराच्या दृष्टीने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. दिनांक २१ ते २४ नोव्हेंबर या दरम्यान बाजार विभागात हा स्टॉल पाहता येणार असून विविध योजनांची माहिती स्टॉलच्या माध्यमातून देण्यात येत आहे.

### चित्रपटकर्मींसोबत संवाद

पहिल्याच दिवशी या स्टॉलला विविध आंतरराष्ट्रीय प्रेक्षक, चित्रपटकर्मींनी मोठ्या संख्येने भेट दिली. या स्टॉलच्या उद्घाटनानंतर महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी येथे उपस्थित असलेल्या माध्यमकर्मी आणि चित्रपटकर्मींबरोबरही खास संवाद साधला. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातून चित्रकर्मींसाठी विविध योजना राबवत असते. या महोत्सवात त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधता यावा, याकरिता संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात विविध भाषिक माध्यमकर्मी व चित्रकर्मींनी सहभाग घेतला.

दैनिक Social Media Edition / Follow us on

# जागर मराठी

www.jagarmarathi.com Mo : 9371497257, 9552347912 Email : infojagarmarathi@gmail.com दि: 23 नोव्हेंबर 2025

# इफ्फी बाजारात देशोदेशीचे चित्रकर्मी आणि माध्यमकर्मींसाठी चित्रनगरीचा स्टॉल खुला

## व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्या हस्ते झाले चित्रनगरीच्या स्टॉलचे उद्घाटन

**माध्यमकर्मी व चित्रकर्मींसोबत साधला संवाद**

**दैनिक जागर मराठी**
**गोवा ब्युरो**

**पणजी** : देशविदेशातील चित्रपटकर्मी, भारतीय प्रादेशिक चित्रपट आणि कलाकार, तंत्रज्ञ अशा मान्यवरांच्या उपस्थितीने ५६ वा भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव गजबजून निघाला आहे. या महोत्सवात सगळ्यांचे लक्ष वेधून घेणाऱ्या वेव्हज फिल्म बाजार विभागात शनिवारी दादासाहेब फाळके चित्रनगरीने उभारलेल्या आकर्षक स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी या स्टॉलचे उद्घाटन केले. मराठी चित्रपटांबरोबरच हिंदी चित्रपट, मालिका आणि विविध माध्यमांसाठी चित्रिकरणाच्या सोयीसुविधांबरोबरच चित्रपट उद्योगाच्या विकासाच्या दृष्टीने कार्यरत असलेल्या



महामंडळाच्या योजना, त्यांचे उपक्रम या महोत्सवात उपस्थित असलेल्या जगभरातील चित्रपटकर्मींपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या स्टॉलच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ गेली काही वर्ष सातत्याने कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासह देशातील आणि देशाबाहेरील निवडक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सहभागी होते आहे. या महोत्सवांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या फिल्म बाजारमध्ये महामंडळाने आपले ठळक अस्तित्व नोंदवले असून मराठी चित्रपटांना या बाजार विभागात व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा, विविध चित्रपट निर्माते, निर्मितीसंस्था यांच्याबरोबर संवाद साधण्यास मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. गोव्यात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या बाजार विभागातही दरवर्षी चांगल्या मराठी चित्रपटांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी महामंडळ प्रयत्नशील असते. यंदा या महोत्सवातील सहभागाचे महामंडळाचे १० वे वर्ष आहे. फिल्म बाजारमध्ये महामंडळाचा आकर्षक स्टॉल उभारत चित्रपट उद्योग विस्ताराच्या दृष्टीने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. दिनांक २१ ते २४ नोव्हेंबर या दरम्यान बाजार विभागात हा स्टॉल पाहता येणार असून महामंडळातर्फे राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती स्टॉलच्या माध्यमातून देण्यात येत आहे.

पहिल्याच दिवशी या स्टॉलला विविध आंतरराष्ट्रीय प्रेक्षक, चित्रपटकर्मींनी मोठ्या संख्येने भेट दिली. या स्टॉलच्या उद्घाटनानंतर महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी येथे उपस्थित असलेल्या माध्यमकर्मी आणि चित्रपटकर्मी बरोबरही खास संवाद साधला. महामंडळ चित्रकर्मींसाठी विविध योजना राबवत असते.

या महोत्सवात त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधता यावा, याकरिता संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात विविध भाषिक माध्यमकर्मी व चित्रकर्मींनी सहभाग घेतला.

लोकमत

# दादासाहेब फाळके चित्रनगरीला दहा वर्षे पूर्ण

## मराठी चित्रपटांसाठी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ

लोकमत न्यूज नेटवर्क

**पणजी :** राज्यात सुरू असलेल्या ५६ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (इफ्फी) अंतर्गत आयोजित वेव्ह्ज फिल्म बाजारात यावर्षी दादासाहेब फाळके चित्रनगरीला दहा वर्षे पूर्ण झाली. या काळात चित्रनगरीने मराठी चित्रपटसृष्टीला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली असून, आजही हा मंच जागतिक बाजारपेठेतील संधींचे नवे मार्ग उघडत आहे.

महाराष्ट्र फिल्म, स्टेज अँड कल्चरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने यंदाच्या इफ्फीत तयार केलेल्या विशेष पॅव्हिलियनमध्ये 'श्री गणेशा' आणि 'मुक्काम पोस्ट देवाच घर' या दोन मराठी चित्रपटांचे आकर्षक प्रदर्शन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय खरेदीदार, वितरक, को-प्रॉडक्शन पार्टनर्स आणि फिल्म कमिशन प्रतिनिधींसमोर या दोन्ही चित्रपटांची प्रभावी मांडणी झाली.



१ फिल्म बाजारातील सहभागाद्वारे महाराष्ट्र सरकारने मराठी चित्रपटांना जागतिक वितरण, आंतरराष्ट्रीय सहनिर्मिती, फेस्टिव्हल सर्किटमध्ये प्रवेश आणि विविध देशांच्या बाजारपेठांशी जोडणीसारख्या संधी देण्यावर भर दिला आहे. मागील १० वर्षांत चित्रनगरी पॅव्हिलियनद्वारे मराठी निर्माते, दिग्दर्शक, तांत्रिक कलाकारांना यातून महत्त्वपूर्ण नेटवर्किंग व व्यावसायिक लाभ मिळाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

२ इफ्फी २०२५ मधील या दहाव्या वर्धापन वर्षानिमित्त आयोजित केलेल्या विशेष उपक्रमांत महाराष्ट्राच्या चित्रपट धोरणातील सकारात्मक बदल, सवलती आणि शूटिंग-फ्रेंडली वातावरण यावरही प्रकाश टाकण्यात आला. मराठी चित्रपटांना

३ आंतरराष्ट्रीय ओटीटी प्लॅटफॉर्म, जागतिक फेस्टिव्हल आणि परदेशी वितरकांशी थेट संपर्क साधण्यासाठी हा मंच अधिक प्रभावी ठरत असल्याचे सहभागी निर्मात्यांनी नमूद केले. फाळके चित्रनगरी पॅव्हिलियनमुळे मराठी चित्रपटसृष्टीने गेल्या दशकात केवळ जागतिक स्तरावर ओळख निर्माण केली आहे.

Goa Main
Page No. 4 Nov 23, 2025
Powered by: erelego.com

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED
शब्दांना सत्याची धार
प्रहार

# जुन्या चित्रपटांचे वैभव प्रेक्षक पुन्हा अनुभवणार



वंचितांचं जगणं आणि त्यात आत्मजाणिवेनं होणारं परिवर्तन यांची हृदयस्पर्शी आणि तितकीच प्रेरणादायी कहाणी असलेल्या 'जिप्सी' या सिनेमाच्या प्रदर्शनाला प्रेक्षकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद लाभला. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळातर्फे पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे नुकतेच शशी खंदारे दिग्दर्शित जिप्सी सिनेमाचा खेळ आयोजित करण्यात आला होता. यावेळी महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, चित्रपटाचे दिग्दर्शक शशी खंदारे, राष्ट्रीय पुरस्कार विजेता बालकलाकार कबीर खंदारे यांच्यासह जिप्सी चित्रपटाची संपूर्ण टीम उपस्थित होती. चित्रपट निर्मितीच्या प्रवासातील गमतीदार किस्से आणि राष्ट्रीय पुरस्कारापर्यंतचा प्रवास आदी गोष्टी मुलाखतीतून उलगडण्यात आल्या.

रसास्वाद मंडळाचा उपक्रम महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दादासाहेब फाळके चित्रपट रसास्वाद मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. जुन्या चित्रपटांचे वैभव प्रेक्षकांना पुन्हा एकदा अनुभवता यावे आणि नव्या पिढीने तयार केलेले उत्तमोत्तम चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचावेत हा या मंडळाचा उद्देश आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून दर महिन्याला किमान एक चित्रपट प्रेक्षकांना दाखवला जातो.

Mumbai Edition
Nov, 21 2025 Page No, 10
https://epaper.prahaar.in

शब्दांना सत्याची धार
प्रहार

# दादासाहेब फाळके चित्रनगरीमुळे मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सहभागाची संधी

◆ **पणजी (प्रतिनिधी):**

भारतीय चित्रपट, तंत्रज्ञ आणि देशोदेशीचे निर्माते, चित्रपट यांच्यात व्यवसायाच्या दृष्टीने संवाद घडवून आणणाऱ्या इफ्फी फिल्म बाजारमध्ये गेली दहा वर्ष सातत्याने दादासाहेब फाळके चित्रनगरीने सहभाग घेतला आहे. यंदा गोवा येथे सुरू असलेल्या ५६ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात वेव्हज फिल्म बाजारमध्ये महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने सहभाग घेतला असून येथे श्री गणेशा आणि मुक्काम पोस्ट देवाचं घर या दोन चित्रपटांचे प्रदर्शन करण्यात आले.

मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध व्हावे, याकरिता महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्फे विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये सहभागी घेतला जातो. गोव्यात होणाऱ्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील सहभागाचे हे अकरावे वर्ष आहे. अशा प्रकारे सातत्याने या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सहभाग घेऊन मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र हे महत्त्वाचे राज्य ठरले आहे. यंदा संकेत माने दिग्दर्शित 'मुक्काम पोस्ट देवाचं घर' आणि मिलिंद कवडे दिग्दर्शित 'श्री गणेशा' अशा दोन मराठी चित्रपटांचे प्रदर्शन फिल्म बाजारमध्ये करण्यात येणार आले. रसिकांना पूर्व नावनोंद करून चित्रपट पाहण्याची संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच २३ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. महामंडळातर्फे बाजार विभागात मुक्काम पोस्ट देवाचं घर आणि श्री गणेशा या दोन चित्रपटांचे प्रदर्शन करण्यात आले.

Mumbai Edition
Nov, 22 2025 Page No, 8
https://epaper.prahaar.in

दैनिक हेराल्ड

# इफ्फी फिल्म बाजारमध्ये मराठी चित्रपटांचे प्रदर्शन

## दादासाहेब फाळके चित्रनगरीचा पुढाकार | आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सहभागाची संधी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी दि ,२१ :** भारतीय चित्रपट, तंत्रज्ञ आणि देशोदेशीचे निर्माते, चित्रपट यांच्यात व्यवसायाच्या दृष्टीने संवाद घडवून आणणाऱ्या इफ्फी फिल्म बाजारमध्ये गेली दहा वर्ष सातत्याने दादासाहेब फाळके चित्रनगरीने सहभाग घेतला आहे. यंदा गोवा येथे सुरू असलेल्या ५६ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात वेव्हज फिल्म बाजारमध्ये महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने सहभाग घेतला असून येथे श्री गणेशा आणि मुक्काम पोस्ट देवाच घर या दोन चित्रपटांचे प्रदर्शन करण्यात आले.

इफ्फीत सहभागाचे हे अकरावे वर्ष आहे. सातत्याने अशा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सहभाग घेऊन मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र हे महत्त्वाचे राज्य ठरले आहे. यंदा संकेत माने दग्दिर्शति मुक्काम पोस्ट देवाचं घर आणि श्री. मलिदि कवडे दग्दिर्शति श्री गणेशा अशा दोन मराठी चित्रपटांचे प्रदर्शन फिल्म बाजारमध्ये करण्यात येणार आले. महोत्सव कालावधीपर्यंत निवडक चित्रपट रसिकांना पूर्व नावनोंद करून चित्रपट पाहण्याची संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच २३ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. महामंडळातर्फे बाजार विभागात मुक्काम पोस्ट देवाच घर आणि श्री गणेशा या दोन चित्रपटांचे प्रदर्शन करण्यात आले. या दोन्ही चित्रपटांना प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.







### चित्रनगरीचा स्टॉल ठरतोय आकर्षणाचे केंद्र

महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संकल्पनेनुसार गोवा राष्ट्रीय चित्रपट महत्त्वाच्या बाजार विभागात स्टेट/कंट्री पॅव्हेलियन मध्ये महामंडळाचा आकर्षक स्टॉल उभा करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनातर्फे चित्रपटकर्मींसाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजना, बाजार विभागात सहभागी झालेले दोन्ही चित्रपट आणि दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या विविध उपक्रमांची माहिती स्टॉलच्या माध्यमातून देण्यात येत आहे. या शिवाय एन डी स्टुडिओची देखील माहिती देण्यात येत आहे.

Dainik Herald Edition
22 Nov, 2025 Page No.2

Dainik Herald Edition
Nov 22, 2025 Page No. 2